उच्च , तंत्र, कला, संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी/ पदव्युत्तर / पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे सुधारीत दर लागू करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्रशिक्षण

शासन निर्णय क्रमांक टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ५ नोव्हेंबर ,२००८

**वाचा :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.टीईएस-३३९६/(७३७५)/तांशि-१, दिनांक १५/२/१९९७**

**प्रस्तावना :-** उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत अभियांत्रिकी , वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, कला शिक्षण, विधी, विज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन इत्यादी पदव्युत्तर, पदवी, पदविका , पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी सैधान्तीक प्रात्यक्षिके , टयुटोरियल, आरेखक, कामाकरीता संदर्भाधिन दिनांक १५ फेब्रुवारी,१९९७ अन्वये अभ्यांगत अध्यापकांना मानधनाचे दर लागू करण्यात आलेले आहेत. अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र इत्यादी अभ्यासक्रम शिकवितांना या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना निमंत्रीत करावे लागते. सदर क्षेत्रातील व्यक्तींना सन १९९७ मध्ये निश्चित केलेल्या मानधानाच्या आधारे आकर्षित करणे व अभ्यासक्रमाचा दर्जा टिकविणे जिकरीचे ठरत असल्याने, अनुभवी तज्ञ व्यक्तींना, अभ्यांगत अध्यापक म्हणून निमंत्रित करण्यासाठी, सध्याच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रश्नांचा सर्वांगीण विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-** उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या उच्च, तंत्रशिक्षण, कला, वास्तुशास्त्र या संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी, पदविका, पदविकोत्तर पदवी व पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अभ्यांगत अध्यापकांना खाली दर्शविल्याप्रमाणे दिनांक १५/२/१९९७ च्या शासन निर्णयान्वये लागु केलेल्या मानधनात सुधारणा करण्यास शासन याव्दारे मंजूरी देत आहे.

| अ क्र | अभ्यासक्रमाचा प्रकार | पूर्वीचे दर(प्रति दीड तास) | सुधारीत दर (प्रति तासाकरीता) |
|---|---|---|---|
| १. | एम.ई/एम.टेक./एम.कॉम./एल.एल.एम. इत्यादी पदव्युत्तर अभ्यासक्रम | रु.२२५.०० | रु.३००.०० |
| २. | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/ कला शिक्षण/महाविद्यालये/तंत्रनिकेतने यातील अभ्यासक्रमासाठी उद्योग/व्यवसाय क्षेत्रातून निमंत्रित केलेले तज्ञ/अनुभव संपन्न ज्येष्ठ व्यवस्थापक/ज्येष्ठ अभियंता इ. | रु.२५०.०० | रु.३००.०० |
| ३. | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/ कला शिक्षण/ विधी/विज्ञान/वाणिज्य/व्यवस्थापन/ शिक्षणशास्त्र इत्यादी पदवी/ पदव्युत्तर पदविका वा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम | | |
| | १) सैध्दांतिक | रु.१५०.०० | रु.३००.०० |
| | २) प्रात्यक्षिके/टयुटोरियल्स/आरेखन काम इत्यादी | रु. ७५.०० | रु.१५०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | अभियांत्रिकी/ वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/ कला शिक्षण संस्थेतील पदविका / प्रगत पदविका / पदविकोत्तर पदविका इत्यादी अभ्यासक्रम.<br>१) सैध्दांतिक<br>२) प्रात्यक्षिके/टयुटोरियल्स/आरेखन काम इत्यादी | <br><br><br>रु.१२०.००<br>रु.६०.०० | <br><br><br>रु.२५०.००<br>रु.१२५.०० |

**वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.**

(१) अभ्यागत शिक्षक निमंत्रीत करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विद्याशाखेतील सर्व शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावरील काम करीत असलेल्या शिक्षकांना प्रमाणकानुसार शैक्षणिक भार दिला आहे याची खात्री करुन घ्यावी.

(२) उद्योग क्षेत्रातील या व्यवसायातील अनुभवी संपन्न व्यक्तींना अभ्यागतासंबंधी पाचारण करण्यात यावे. मात्र त्यांना अभ्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीने निमंत्रीत करण्यात येऊ नये.

(३) तासिका तत्वावरील कोणत्याही उमेदवारास एकाच महिन्यात त्यांच्या दर्जाच्या अनुज्ञेय वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या वेतनश्रेणीच्या रक्कमेपेक्षा जास्त मानधन द्यावे लागू नये. याची जबाबदारी संबंधित संचालक/प्राचार्य यांची राहतील

(४) तासिका तत्वारील निमंत्रीत हे सेवानिवृत्त वा संबंधित अभ्यासक्रमाशी निगडीत व्यवसायातील तज्ञ व्यक्ती पुरते मर्यादित राहतील. कोणत्याही स्थितीत बॅकडोर परिस्थिती उद्‌भवेल असे उमेदवार या प्रयोजनासाठी निमंत्रित करण्यात येऊ नये.

२. वरील सुधारीत दर हे शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. हा आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र ५३६/२००८/व्यय-५, दिनांक २८/८/२००८ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळ "www.maharashtra.govt.in " वर ठेवण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्र.२००८११०५१६०१४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(कांतीलाल उमाप)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्राचार्य, ॲकॅडमी आर्किटेक्चर, मुंबई
कक्ष अधिकारी, तांशि-१, तांशि-२, मशि-१, मशि-२, मशि-३
निवड नस्ती, तांशि-५